महाराष्ट्र शासन
इतर मागास बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

कार्यालय, व्यवस्थापकीय संचालक, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर

पत्ता : डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, ३ रा माळा, दीक्षाभूमी रोड, श्रद्धानंद पेठ, नागपूर § ४४० ०२२
दूरध्वनी क्र.०७१२- २९५९३८१ CIN No. U८५३००PN२०१९NPL१८७४०५ ई-मेल: mahajyotingp@gmail.com

जावक क्र.महाज्योती/PhD/२०२४/१८२५ दि.२९/०७/२०२४

## परिपत्रक

**विषय : पीएचडी अधिछात्रवृत्ती-२०२३ योजनेअंतर्गत कागदपत्रे पडताळणी करण्यासाठी नियोजित कार्यक्रम पुढे ढकलण्याबाबत.**

या कार्यालयाचे परिपत्रक क्रमांक महाज्योती/पीएचडी/२०२३/१८९९/२०२४-२५ दि.२६.०७.२०२४ अन्वये पीएचडी अधिछात्रवृत्ती-२०२३ योजनेअंतर्गत अर्ज केलेल्या उमेदवारांची दि.३१.०७.२०२४ ते दि.०७.०८.२०२४ या कालावधीमध्ये महाज्योती कार्यालय, नागपूर येथे कागदपत्रे पडताळणी करण्याचे नियोजित करण्यात आलेले होते.

तथापि आता या अनुषंगाने महाज्योती कार्यालयाकडे अनेक विद्यार्थ्यांचे निवेदने प्राप्त होत आहेत. विद्यार्थ्यांना कागदपत्रे पडताळणी करिता आवश्यक नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्र उपलब्ध करून घेण्यासाठी अवधी लागणार आहे तसेच विद्यार्थ्यांना इतर कागदपत्रे पडताळणी करताना आवश्यक कागदपत्रे जमा करण्यासाठी अवधी लागणार असल्याचे विद्यार्थ्यांनी महाज्योती कार्यालयास कळविलेले आहे.

विद्यार्थ्यांना नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्रासहित इतर आवश्यक कागदपत्रे कागदपत्र पडताळणीच्या दिवशी सादर करता यावीत तसेच त्रुटी पूर्तता करण्यासाठी वारंवार महाज्योती, नागपूर कार्यालयात यावे लागू नये या उद्देशाने विद्यार्थ्यांची मागणी विचारात घेऊन विद्यार्थ्यांना नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्रासहित इतर आवश्यक कागदपत्रे जमा करून घेण्यासाठी अवधी लागणार असल्याने पीएचडी अधिछात्रवृत्ती-२०२३ योजनेअंतर्गत अर्ज केलेल्या उमेदवारांची कागदपत्रे पडताळणी कार्यक्रम पुढे ढकलण्यात येत आहे.

तरी सर्व विद्यार्थ्यांना कागदपत्रे पडताळणीची सुधारित दिनांक लवकरच महाज्योतीच्या संकेतस्थळावर परिपत्रकाद्वारे कळविण्यात येईल, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

-स्वा-
(राजेश खवले)
व्यवस्थापकीय संचालक,
महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व
प्रशिक्षण संस्था (महाज्योती), नागपूर